**UNIFIL मधील संयुक्त राष्ट्र शांतता रक्षकांवरील हल्ल्याबाबत प्रसिद्धी पत्रक**

18 एप्रिल 2026

UNIFIL मध्ये तैनात असलेल्या फ्रान्सच्या संयुक्त राष्ट्र शांतता रक्षकांवर आज झालेल्या हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. आम्ही शहीद झालेल्या ब्लू हेल्मेट जवानाला श्रद्धांजली अर्पण करतो आणि जखमी झालेल्या इतर तीन शांतता रक्षकांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी अशी इच्छा व्यक्त करतो.

2. भारताने शांतता रक्षकांवरील गुन्ह्यांच्या उत्तरदायित्वाबाबतचा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा ठराव 2589 पुढाकार घेऊन मांडला होता. आम्ही लेबनॉन सरकारला या हल्ल्याचा तातडीने तपास करण्याची, दोषींना कडक शिक्षा देण्याची आणि संयुक्त राष्ट्र शांतता रक्षकांविरुद्धच्या या गुन्ह्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करण्याची विनंती करतो.

3. संयुक्त राष्ट्रांच्या वास्तू आणि कर्मचाऱ्यांची प्रतिष्ठा तसेच त्यांच्या सुरक्षिततेचा आदर राखण्याच्या महत्त्वावर भारत पुन्हा एकदा भर देत आहे. तसेच, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या आदेशानुसार तैनात असलेल्या सर्व शांतता रक्षकांच्या सुरक्षेची खात्री देण्याचे आवाहन भारत सर्व घटकांना करत आहे.

**नवी दिल्ली**

18 एप्रिल 2026